| अ.क्र. | आवश्यक असलेली माहिती | उत्तर |
|---|---|---|
| 1 | Has a new circular or order been issued (on or around July 2025) by the office of Additional Director General of Police Traffic Maharashtra or Transport Department, expressly prohibiting traffic police personnel from using personal mobile phones for recording traffic violations or issuing eChallans as reported in Lokmat Times on July 9, 2025. | The copy of circular dt. 03/07/2025 issued by Additional Director General of Police (Traffic) Maharashtra State regarding prohibiting traffic police personnel from using personal mobile phones for recording traffic violations is attached herewith. |
| 2 | The order number, issuing authority, date and a certified copy of the circular or order. Whether the order is applicable across all traffic divisions in Maharashtra or only within Greater Mumbai. | The said order is applicable across all traffic divisions in Maharashtra including Greater Mumbai. |
| 3 | What mechanism or process is in place for a civilian to verify that a traffic challan issued to them was generated through an official eChallan device or application and not created using the officer personal mobile phone or unauthorized device? Please provide relevant standard operating procedures (SOPs), circulars or verification guidelines that a citizen can rely upon for such authentication. | There is no such mechanism or process in place for a civilian to verify the authorization of eChallan device. |

जा.क्र.अ

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता,
मोती महल, ६ वा मजला, १९५, जे. टाटा मार्ग,
सी.सी.आय. क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दुरध्वनी क्र. :(०२२)- २२८२ ०३११
E-mail : adg.traffic.hsp@mahapolice.gov.in

जा.क्र. अपोमसं (वा.)/४५/नियोजन/ई-चलान/मा. मंत्री परिवहन बैठक निर्देश/३३३१/२०२५ दिनांक : ०३/०७/२०२५

प्रति,

१) मा. पोलीस आयुक्त, मुंबई शहर
पोलीस आयुक्त- ठाणे शहर/पुणे शहर/नवी मुंबई/नागपूर शहर/पिंपरी-चिंचवड/नाशिक शहर/छत्रपती संभाजी नगर/सोलापूर शहर/ अमरावती शहर/ मिरा भाईंदर वसई विरार/ लोहमार्ग, मुंबई.

२) पोलीस अधीक्षक- अहिल्यानगर/ अकोला/अमरावती/ छत्रपती संभाजी नगर ग्रा./बीड/ बुलढाणा/ भंडारा/ चंद्रपूर/जालना/ धाराशिव/नांदेड/लातूर/परभणी/हिंगोली/कोल्हापूर/पुणे ग्रा./सांगली/सातारा/सोलापूर ग्रा./गडचिरोली/ गोंदिया /नागपूर ग्रा./ धुळे/ जळगाव/ नाशिक ग्रा./नंदुरबार/ रायगड/ रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे ग्रा./ पालघर / वाशिम/ यवतमाळ/ वर्धा

३) पोलीस अधीक्षक- महामार्ग पोलीस ठाणे/पुणे/ छत्रपती संभाजी नगर /रायगड व नागपूर परिक्षेत्र.

**विषय:- ई चलानची कारवाई करताना स्वत:च्या खाजगी मोबाईल फोनचा फोटो/चित्रीकरण करीता वापर न करण्याबाबत.**

**संदर्भ :- (१) दि. ०२/०७/२०२५ रोजी मा. परिवहन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली वाहतुक संघटनांसोबत झालेली बैठक.**
**(२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. अपोमसं (वा)/४४/वाचक/ई-चलान/७४३/२०२० दिनांक २/३/२०२०**
**(३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. अपोमसं (वा)/४५/नियोजन/ई-चलान/२९६३/२०२० दि. १/९/२०२२**
**(४) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. अपोमसं (वा)/४५/नियोजन/ई-चलान/२८२६/२०२४ दि.१६/९/२०२५**

******

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून मा. मंत्री, परिवहन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ०२/०७/२०२५ रोजी विधान भवनात वाहतूक संघटनांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

वाहतुकीचे नियमन करण्यासाठी नेमलेले वाहतुक पोलीस अधिकारी/ अंमलदार हे त्यांचे खाजगी मोबाईलद्वारे एकाच वेळी मोठया संख्येने वाहनांचे फोटो काढून ते सोयीनुसार ई चलान प्रणालीमध्ये अपलोड करून चुकीचे चलान देतात बाबतचा मुद्दा सदर बैठकीमध्ये वाहतूक संघटनांचे प्रतिनिधी यांचेकडून उपस्थित करण्यात आला होता. त्याबाबत मा. मंत्री, परिवहन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या कार्यालयाकडून ई चलानची कारवाई करताना स्वत:चे खाजगी मोबाईल फोनचा वापर न करणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र. २ ते ४ चे पत्रान्वये यापुर्वीच आदेशीत करण्यात आले होते.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही पोलीस घटकातील पोलीस अधिकारी /अंमलदार हे स्वत:च्या खाजगी मोबाईल फोनद्वारे फोटो काढून वास्तविक वेळ (real time) सोडून, ते सोयीनुसार ई चलान प्रणालीमध्ये त्यांचे मोबाईलमधील फोटोचा वापर करून चुकीच्या पध्दतीने चलान जनरेट करतात. अशाप्रकारे खाजगी मोबाईलद्वारे फोटो काढून सोयीनुसार ई चलान करताना पोलीस अधिकारी/ अंमलदार निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

(प्रविण साळुंके)
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
महाराष्ट्र राज्य मुंबई

<u>प्रत माहितीकरीता:-</u>
१) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

| अ.क्र. | आवश्यक असलेली माहिती | उत्तर |
| --- | --- | --- |
| १ | ०१/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२, ०१/०१/२०२३ ते ३१/१२/२०२३, ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४, ०१/०१/२०२५ ते ३०/०६/२०२५ या कालावधीत वाहतूक विभागाने नो पार्किंगसाठी दिलेल्या चलनांची एकुण संख्या देण्यात यावी. यापैकी किती चलनांचा दंड वसूल करण्यात आला व दंडापोटी गोळा केलेल्या रक्कमेचा तपशील देण्यात यावा. | नो पार्किंग अंतर्गत मोटर वाहन अधिनियम (MVA) चे कलम १२२ व मोटार वाहन चालक नियम (MVDR) कलम २२ मधील पार्किंगबाबतच्या तरतूदींचा भंग केल्याप्रकरणी दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३०/०६/२०२५ या कालावधीतील ई चलान कारवाई तसेच दंड वसूलबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:- |

| वर्ष | एकुण चलान संख्या | पेड चलान | पेड चलान रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| २०२२ | १३,७८,११४ | ६,२१,१३४ | ४३,९०,३०,००० |
| २०२३ | २४,७२,६५९ | १०,१०,४५४ | ८५,२७,५३,००० |
| २०२४ | २७,८२,२२१ | ८,६९,७२१ | ७६,९३,७७,५०० |
| २०२५ | १४,४२,२०० | २,६४,४०१ | २५,८२,३९,५०० |
| एकुण | ८०,७५,१९४ | २७,६५,७१० | २,३१,९४,००,००० |